९८६७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५६५



REFBK-0011958
REFBK-0011958

सं० १८६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत.
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक ९५६५५ नों. दि. ....

व्हराड् माती

वऱ्हाड मातीवरील – वऱ्हाडी बोलींतील

प्राय: पहिलींच प्रदीर्घ कवनें

श र च्चं द्र

REFBK-0011958
REFBK-0011958

नाग-विदर्भ प्रकाशन
अमरावती

मूल्य दीड रुपया

प्रकाशक

पुं. ना. देशमुख,
नाग - विदर्भ प्रकाशन
अमरावती (महाराष्ट्र)

प्रथम आवृत्ति
" गुरुदेव टागोर शतसंवत्सरी, "
खास उत्सव,
१७ वैशाख वद्य, १८८३

मुद्रक

त्रिं. शं. केतकर,
वनिता मुद्रण,
अमरावती

सर्व हक्क

सौ. सुगीतेश्वरी सिंह
" यौगंध " कँप - अमरावती
विदर्भ-महाराष्ट्र.

श्रेय

माननीय श्री० कृ० व्यं० पेशकार श्री० आप्पासाहेब केतकर, श्री० नानाजी देशमुख, श्री० दे० गो० उदापुरे, श्री भाईजी डांगे **आणि सर्वश्री** भास्करराव केशवराव पिंपळकर, नामदेवराव काशीराव देशमुख, नागोरावजी रूखबसा कापसे, गोविंद सोनाजी मुरतकर, गोविंद पांडुरंगजी पाटणे, माणिकराव नि. उमाळे, अवधुत उकंडराव राऊत, दत्तूजी शिंदे, प्रल्हाद शामराव पाटणकर. ! पुन्हा मी कायमचा ऋणाईत झालो आहे. !!

शरच्चंद्र

स प्रे म सा द र प्र णा म !

" मऱ्हाटी भाष जेतुला ठायीं वर्ते, तेतुला तेतुले – महाराष्ट्र, म्हणजे महंत राष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र ! महंत म्हणजे थोर – महान ... एवं जड - चेतनामध्यें पांचा गुणांचे अनुवर्तन ठायीं असलेल्या ... जेतुला अर्थीं आपली थोरी असे, तेतुलाहि अर्थी आणिकासि थोर करी ... अशा थोरा पासौनि महाथोर – महाराष्ट्र भूमीच्या " पंचप्राणांपैकी आपलं आवघं वऱ्हाडहि एक प्राण ! – अन् आपली वऱ्हाडी बोली ही तर वऱ्हाडच्या काळ्याशार मातीची मुलायम प्राण-बोली !! म्हणूनच भारतमातेच्या अर्चनेनंतर महाराष्ट्रभूमीच्या पूजनामागोमाग वऱ्हाड-मातीचं हें भजनहि ! आपल्या बहुजन बांधवासाठीं संतजनांच्या पावलांचा नम्र मागोवा घेत घेत, वऱ्हाडच्या बोलींतच करण्याचं प्रयोजन - आणि औचित्यहि !!

प्रणाम !

श र च्चं द्र

वैशाख वद्य १७, १८८३
अ म रा व ती

८८
१९६१

मराठी
मनाच्या
माणसांस
अर्पण
असे

व्हराड् माती

" मातीच्या बोलींत
मा तीचं भजेन,
या गा संतजेन
आसीसाले !

११९५८

…ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ………… दि: …………
क्रमांक ………… नोंद दि: …………



माही अरे माती
मायची गा माय,
ध रती ची सा य
 का यी शा र !

चव तिची जसी
वानी कनीसाची
हिर्यी दूद-कच्ची
 वा न गी च !

कायी मिठ्ठी माही
म्ह नू नं तं बाई
चोरू चोरू खायी
 पो टु सी गं !

कूस या मातीची
चंदेनाचा गाभा
अंकुराची आभा
ठायी ठायी ! २०

दूरचा पाहाड
पाह्यते थो पिता
लेकरू खेयता
लफाडांत !

डोंगरीं थ्या झिरा
म्हादेवाचा बोल,
पूर्नां वाह्ये खोल
गंगा मा वो !

हवा मावसीले
माया कमी नायी
फुलू फुलू वाही
दीठ काढी !

नियायोची नियी
इथी खालत्यी ये
पान्यासंग खेयें
मोटीं पाटीं !

आनत्ये ऊबग
माडी वाडा गढी,
झांपाची झोपडी
ऊब देत्ये ! ४०

बोली माही बोली
गुयाची गा राब,
सांभायत्ये आब
गां व रा नी !

लोक माहा लोक
सादा सुदा नेक,
जिव्हायाले सेक
ला वू नो ये !

भाकरीचा जाग
अकलीचा राग
पर पट्टचा वाघ
कामाले थो !

दुखन्याले घ्यावा
खुशाल भिलावा
ऊबारीचा लावा
ऊ ब ज त्ये !

आपला आपुन
उ भ व ते भा ग
आ ड व ता ना ग
ब न त्ये थो !

प य स म नां त
उच्चा पक्का साग
कोनी त्याले बाग
दे ऊ नो ये !

काटचानं भारली
भर्दार बाभूय,
बुंध्याले हरय
कोम्ब घेत्ये !

हीवराचा तंटा
मेंदी रंगवत्ये,
कैरी गोड होत्ये
पीकली का !

जांभूय बनाले
निम्बवाट थेट,
शिंदोयांचा थाट
नेट घेत्ये !

बर्बटी मुगाले
जेवारीचा सूर,
कपासीत तूर
हरीकते !

येसीच्या बांधाले
पेवंदी सीवार,
आंगनी बाहार
कन्हेरीची !

काकड – पाह्मटी
सेन सिंपवन,
रही जात्यातून
किस्न गात्ये !

दोह्यपारी आंग
थेंब थेंब न्हाते,
इथीसा धरत्ये
सुगी जीव !

सांज वाजवत्ये
झांजर खंजेरी,
आभायी मंजेरी
चमक्ते गा !

राती बात झोप
कुबेराचं दान,
कोनालेई नेनं
होनं नाई ! १००

व्हराडी गा भाऊ
झिजल्येला गोटा,
आडवती वाटा
ल व्हा ये ई !

व्हराडी गा भाऊ
गोटचाची थ्या रेती,
टर्बूजाची श्येती
ट र्रा र त्ये !

तरी थो मगन
आप्ल्यातच बाबा
जर नाई हवा
भा ई र ची !

रिनांत करत्ये
लगन न् जत्रा,
ढोसू ढोसू सत्रा
गाव खात्ये !

उद्या काई नसो,
आज बस्स एक
चीलमीची फूक
लंबा धुव्वा !" १२०

व्होती असी बात
एका जमान्यांत
आता ईथीसातं
वारं न्यारं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक .... नों. दि: ....

दुनिया बदल्ली
बदल्लं रे मन,
सव्र्यात ईमान
बदल्लं गा !

कायचा कायले
नाई धरबंद,
मायेला रे फंद
पैसा देत्ये !

म्हनू नये बापा
म्हना लागत्येच,
भैनीलेई पेच
भोवाचा गा !

होऊ नोये असी
झाली वाताहात,
मु च क ला हात
पा व ना चा ! १४०

श्रीष्टीचा गा नेम
ओढ तिथी तान्हा,
माया तिथी पान्हा
उ चं ब ळे !

ओढीले ओयख
पा य जे च प न,
पान्ह्यालेई थान
दू द भ र !

ऊरात जे होत्ये
नी य त ज त न
हा ता पा या तू न
ऊ त र ते !

जु नी बि रू दे च
अ भं गीं गो व ली
तुक्याची साऊली
पि ऊ नि या !

कोनत्याई राती
गाती जे सांगाती
अभंगाची जाती
धन्य ते गा ! १६०

पान्याचं अभंग्

येका येड्याची गा
बात सांगतो मी,
शायन्याच्या कामीं
नाई - नसो !

पर्येत्नाचा पर्‌भू,
गंगाईचा तात,
होता भागीरथ
येडा येक !

म्हनानंतं मोठा
नाईतं लाहान,
पन त्याचा प्रन
भारी व्होता !

ध्यास व्होता त्यास
एकच तो असा -
विस्वंभरा वसा
लावियेला !

छाती प्येत्ये माती
मान सती-वान
हातांत काकन
घाम ताथा !

खपला वज्जेर
काय क्येलं त्यानं
पान्याले पावन
वान देल्लं !

मीस केलं-झालं
पीतराइ्च्या पायी,
पेंगती पुन्याई
जागी क्येली !

सोर्ग आला खाली
उतरली गंगा
अम्रीताले सांगा
लय झालं !

पन शायने हो !
पान्या वोयखता!
वायूपाठी सता
त्येचीच गा !

म्हून आंदी करू
पानी परीचव
गंगाजय चव
वोयखाले !

सादं पानीमानी
प्ये ता पोटभर
आं गी सवासेर
मा स च ढे !

नीरं सु धं पानी
येत्ये अकारून
गु ना का रा तू न
वा यूं चि या !

वायू करे जोर
जीवन घे सास,
सास जीवनास
चालवे गा !

म्हनून पान्याले
म्हनती 'जीवन'
आंत बाहेरून
चोखट त्ये !

पांचाभूती येक,
पन् गड्या ! तीन–
रूपा गुनांतून
ओथंबलं !

सफा एक पानी,
ताप करे वाफ,
त्याचं घन-माप
गारपीट !

पान्याचं अभंग

पानी येत्ये जात्ये
मुरवत्ये माती
पोसायाले जाती
सत्वांतून !

पानी धारानी
लावन्यांत न्हानी,
साहा रितू गूनी
राजस गा !

पानी कोसयता
ऊतू येत्ये पूर
येमाचा घ्ये सूर
तामस थो !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९५८

तीनी रूपा–गूनीं
मानसाचं होत
पन तया रीत
काभा नाई ! ८०

यमुनेच्या न्हानीं
गंगेचं रे पानी
शिरंग ये ध्यानीं
गो ता ई चा !

जो जो जसा जसा
दाखवत्ये रंग
राहे तया संग
तै सा चि या !

म्हनतो म्हनून
पानी कल्पव्रिख,
व्येवहार चोख
राखा निस्ता !

पानी माती-येल,
येल आली भरी,
जाई जुई सिरी
गं गा ज य !

अरे जीव ऊना
गंगाजया विना
फेडायाले रिना
आ नं ता च्या ! १००

मातीत हे 'कायी'
रातींत पु न व,
तसं पानी नवं,
गं गा ज य !

झाडांत चं दे न
पु स्ते कां त येद
र सां त शहेद
गं गा ज य !

पुरूले इ क्र म,
इक्रमाले पिर्ती,
साजरीले निती,
ग गा ज य !

येवढ्याच साठी
पानी पानी झाला,
नभ रिता केला
मातींत या !

आता सांगा मले
चढवलं पानी
पान्यालेच ज्यानी,
येडा का तो ? १२०

कस्टाचं अभंग्

माह्या भागीरथ
राजा व्होता राजा,
काट्याचा गा बोजा
पेल्ला त्यानं !

बोजा हो मुगूट
अ व त र ना नं,
गं गा ये सन्नान
इथी जव्हा !

त्याच देसी – लोकी
त या चं वंसज,
नाई आम्हा लाज
उ ली सी क !

माफी करा मले
सांगतो मी पस्ट,
आज ऱ्हाये कस्ट
पो र का रे !

कस्टासिवा बापा
नाई बरी गत,
भूताचं रगत
झपाटो ये ! २०

तारते फकत
कस्टाची भाकर
स्वार्थ ऊपकार
एकातच !

कस्टासिवा जो जो
करे द्येव द्येव,
राह्ये त्याचा प्येव
रीकामाच !

रीकामा थो प्येव
च्येव नाई राया,
मंग घसराया
        येळ काय ?

कस्टा कस्टांतला
खरे खोटे पना
काय मी पाव्हना
        सांगू बापा ?

मनालेच पुसा
पुसा एक डाव
जागवून भ्येव
        मरनाचं ! ६०

कोनी काई म्हनो
अन्नदाते हो तं
फिरवता जा तं
दु नि ये चं !

ढिल्ला झाला जोर
खुटयावर तुम्चा,
नासे भाकरीचा–
उंडा नासे !

म्हून तरी पूंजा
भागीरथ कस्ट,
क रो नि या नस्ट
आ य सा ले !

उफानता धान
जसा दाना न्हाये,
दूर उडू जाये
तूस तूस !

बरं इत्लं तरी
सांगा तं इच्यारीं,
कसी हे भाकरी
पानीं येत्ये ! ८०

नुस्ती कुठीतरी
पाह्यली जमीन,
पडीत वैरान,
काय व्होत्ये ?

बरं कुंदा क्येला
क्येली ना वाहींत,
कस नाई येत
तोंडा तोंडी !

पेरल्या दान्याले
पानी ना निंदन,
कापनी कांडन
कायची व्हो ?

जेवारीची रास
ग्ये ली कनगींत,
पीठ गाडग्यांत
नाई तं गा ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक .... नों: दि: ....

पोठांत आंधन,
रांधल्या ना ग्येली,
थापू ना श्येकली,
भाकरी का ? १००

अस्या कस्टाले या
कितीक पारंब्या,
अरामांले तंब्या
देतीच थ्या !

कस्टाच्या पायऱ्या
दूद-साय-दही,
ईरजन-रही
लोन्या लागी !

चुकला का नेम-
पायरी जरासी
साकड्याची फासी
तावनी ले !

कोनत्याई कामी
अरे हेच रीत,
लाजाची ना बात
कामी कोन्या !

एका एका हातीं
अरे जगन्नाथ,
रात दीस साथ
त्याची आंगी ! १००

पन सां ग तो च
नवा मी द्रिष्टान्त-
ऐका, सोडा खन्त
मा ग ल्या चो !

चोपड्या सपाट
हातीं काई माये ?
नुस्ते हेवे – दावे
सारवे जो ?

खोल उमटल्या
कस्ट-रेघा हाती
प्रिथ्वीभार मोती
सांभायी थो !

पक्केपना हाती
पोलादाच्या वानी
पक्केपना मनी
राह्यतेच !

येक येचा करा
जम्ते त्येच काम,
त्याच हाती राम
मुक्कामाले ! १२०

राम राम !

प्रस्तुत कवनांतील

बोलांचं रहस्य

वऱ्हाडी बोलींतील बोलांशिवाय गाथागीतार्थांतून प्रचलित असलेले मोजकेच शद्ब कवनांतून आहेत – क्वचित् नागरी शद्बहि ! वऱ्हाडी बोलीशी घनिष्ट परिचय नाही अशा नागरबांधवांच्या सोयीसाठीच बव्हंशीं अर्थनिर्णायक तेवढ्या शद्बांचं रहस्य इथं खुलं आहे !!!

व्हराड् माती

पान एक

आसीसाले : आशीर्वाद देण्यासाठी

पान दोन

वानी कनीसाची : वाणीच्या कणीसाची; वऱ्हाडच्या वाणीचा ओला हुरडा खायला खूप गोड असतो.

हिर्यी : हिरवी - गच्च.

वानगीच : नव्हाळीचा; नवीन नमुना म्हणून.

कायी मिठ्ठी माही : माझी (ही) काळीशार जमीन (अशी) गोड आहे, म्हणून–

पोटुसी : गर्भवती

पान तीन

आभा : छटा; (या ठिकाणीं : सामर्थ्य)

लफाडांत : खुल्या - उघडया मैदानांत

पान चार

फुलू फुलू : फिरून फिरून आनंदाने

दीठ : दृष्ट.

नयायीची निर्यी : आ का शी चा. नीलिमा

खेये : खेळें

मोटीं पाटीं : मोटेंतील पा ण्यां त आणि पाटांतील प्रवाहांत

गढी : मातीचा किल्लेवजा भक्कम वाडा

झांपाची : पाना-फांद्यांची बनवलेली

पान पाँच

बोली : वऱ्हाडी बोली

माही : माझी

राब : लापशीसारखा अत्यंत चवदार पदार्थ

आब : मर्यादा; बोज

सेक : शेक; (येथें धक्का या अर्थी)

जाग : तत्पर

पान सहा

ऊबारीचा : विनाकारण, जास्तीचा

पयस : पळस (एक झाड)

साग : सागाचं झाड

बाग : बांक (वाकविणें या अर्थी)

पान सात

भारली : भारी झाली

भर्दार : भरदार (पक्की)

हरय : हिरवळ्

हीवराचा तंटा : हिवराचं झाड फार कच्चं असतं म्हणून !

मेंदी रंगवत्ये : विशेषतः लग्नप्रसंगी वधूच्या हातापायास मेंदी लावतात !

नेट : त्रास

पान आठ

हरीकते : हर्षते

येसीच्या : वेशीच्या

सीवार : शिवार

काकड–पाहचेटी : पहाटच्या वेळीं खेड्यापाड्यांतून काकड आरती होते ती वेळ

सेन सिंपवन : शेणाने सडा – शिंपवण

पान नऊ

दोहचपारी : दुपारीं

बात : (इथं) त्वरित, ताबडतोब

पान दहा

लव्हायेई : लव्हाळीं देखील

टर्रारत्ये : तरारून येतें

मगन : मग्न

भाईरची : बाहेरची

पान अकरा

रिनांत : ऋणांत (कर्जांत असताना देखील !)

बात : (इथं) गोष्ट

इथीसातं : इथं तर

पान बारा

धरबंद : आवर - मर्यादा

फंद : बिघाड

भैनीलेई : बहिणीसहि

पेच : प्रश्न, समस्या

पान तेरा

मुचकला : लचकला

पावनाचा : पावित्र्याचा

उचंबळे : उफाळून येई

ओयख : ओळख

थान : स्तन

पान चवदा

उरांत : मनांत

नीयत : निती, अस्मिता

बिरूदेंच : ब्रीदेंच (तत्वज्ञान)

अभंगाची जाती : अभंग प्रकार

पान्याचं अभंग्

पान पंधरा

बात : गोष्ट

पान सोळा

पर्येत्नाचा : प्रयत्नाचा

परभू : प्रभू, श्रेष्ठ

तात : पिता

प्रन : पण (प्रतिज्ञा)

बसा : स्वतः होऊन स्वीकारलेलें व्रत

पान सतरा

सती-वान : सतीचं वाण

पावन : पुण्यरूप

वान : रंगरूप

मीस : निमित्य

पान अठरा

सोर्ग : स्वर्ग

अम्रीताले : अमृताला

लय झालं : फार झाला मोठेपणा ! (फार झाली बढाई !)

वोयखता : ओळखता

सता : सत्ता, अधिकार

परीचव : परिचय

पान एकोणीस

नीरं : नुस्तं

सुधं : शुद्ध
सास : श्वास

पान वीस

चोखट : शुद्ध, निर्मल
ओथंबलं : भरून आलं

पान एकवीस

जाती : प्राणीजात
सत्वांतून : सात्विक गुणांतून
साहा रितू : साहा ऋतू
येमाचा : यमाचा (मृत्यूचा)

पान बावीस

काभा : कां म्हणून

पान तेवीस

निस्ता : फक्त
माती येल : मातीरूप वेल

पान चोवीस

'कायी' : वऱ्हाडची ती काळीशार जमीन
इक्रम : विक्रम, शौर्य
साजरीले : सौंदर्यसंपन्न स्त्रीला

पान पंचवीस

चढवलं पानी : पाणी चढविलं, तेज चढविलं (इथं पाणी : तेज)

कस्टाचं अभंग्

पान सव्वीस

पेल्ला : पेलला, तोलला

पान सत्तावीस

इथी : इथं

जव्हा : जेव्हा
उलीसीक : यत्किंचितहि

पान अठ्ठावीस

फकत : फक्त
द्येव द्येव : देव देव (नामस्मरण)
प्येव : पेव (धान्य साठविण्यासाठी जमीनींत खणलेला खोल विहीरसदृश खड्डा)

पान एकोणतीस

च्येव : चेव, जागृति
येळ : वेळ

पान तीस

खुट्यावर : जात्याच्या (त्या) खुंट्यावर
उंडा : ज्वारी – पीठाचा भाकरीसाठी तयार केलेला गोळा

पान एकतीस

उफानता : उफणता (उफणणें-दाणा व कोंडा अलग करण्याची क्रिया)

पानीं : पानांत, ताटांत

पान बत्तीस

कनगींत : कणगींत (कणगी – धान्य सांठविण्याची जमीनीवरची कोठी)

पान तेहतीस

अरामाले : आरामाला
तंब्या : तंबी (समज देणें या अर्थी)
इरजन रही : विरजण आणि रही

पान चवतीस

नेम : नियम
साकड्याची : संकटाची
तावनीं : स्वयंपाकासाठी मातीचं भांडं

पान पस्तीस

माये : मावे

पान छत्तीस

वानी : सारखं
येचा : वेचा, निवडा
जम्ते त्येच : येत असेल तेंच

का यी ची
सा य

• 'शारदाबंधु' यांनी निवेदनासह स्वतः सादर केलेला 'महाराष्ट्र माती' या कवनाचा स्वतंत्र कार्यक्रम 'ऑल इंडिया रेडिओच्या नागपूर केंद्रावरून' शनिवार दि. २२-४-६१ रोजी रात्री ९। वाजता प्रसृत होऊन गाजलेला आहे!

• "महाराष्ट्र माती", महाराष्ट्राच्या विख्यात 'साधना' साप्ताहिकाच्या शनिवार दि. १८ मार्च १९६१ च्या अंकात सर्वप्रथम अंतर्भूत झालेली आहे.

• "पाण्याचे अभंग" हिंदुस्थानच्या १९६० च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाले आहेत.

• "कवड्यांचे अभंग" मात्र याच संग्रहात प्रथम प्रकाशित होत आहेत.

“ का यी ची   सा य ”

(यवतमाळचे तपस्वी कवि श्री. पांडुरंग श्रावणजी गोरे यांनी लिहिलेली प्रस्तावना.)

अजून मी पाहिलेंहि नाहीत असे अगदी अपरिचित, पण काव्यामुळे आता पूर्ण परिचित वाटत असलेले अमरावतीचे माझे नवीन कविमित्र “ शरच्चंद्र ” यांचा वऱ्हाडी बोलीतील “ व्हराड् माती ” हा काव्यसंग्रह पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे. प्रस्तुत काव्यास प्रस्तावना लिहावी म्हणून शरच्चंद्रांनी मला पत्रांतून विनंति केली, गळ घातली, पण तसें करण्याचें बळ माझ्या लेखणींत आहे असें मला वाटेना, शिवाय मी आजारीहि – यास्तव त्याप्रमाणे कळवून त्यांना नम्र नकार द्यावा की काय असा विचार प्रथम झाला होता. पण त्यांचं काव्य पूर्ण वाचलं, आणि पत्रांतील सौजन्यशीलतेपेक्षांहि त्यांच्या या गोड काव्याने मी इतका भारावून गेलो की त्यांना तसें लिहिणें मला इष्टच वाटेना. म्हणून तसं पाहिलं तर वऱ्हाडी भाषेची तशी कांही तपश्चर्या नसताना आज हे दोन शद्ब लिहिण्याचा हिय्या करीत आहे. दुसरीकडून तर वऱ्हाडच्या या मातीविषयी – तिच्या कणाकणाविषयी मला कणश: अभिमान आहे, तद्वतच तिच्या भाषेचा मान वाढविण्याकरिता आजकाल अधूनमधून चाललेल्या तिच्या गुणगानाकडे देखील माझे कान लागून असतात. स्वत: मी या वऱ्हाडचा एक वतनदार – म्हणूनहि वऱ्हाडच्या भाषेकडे माझा ओढा असणें स्वाभाविक आहे.

प्रथमतः एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते की 'शरच्चंद्र' हे जरी उगवते कवि असले तरी त्यांचें हें काव्य स्वतंत्र व वैशिष्ठ्यपूर्ण असें आहे. त्यांचें हें काव्य प्रासादिक व रमणीय तर आहेच पण त्यांत वऱ्हाडांतील शुद्ध संस्कारित व निरागस वातावरणाचे उठावदार बिंब उमटलें असून – कवीचें ठळक व्यक्तिमत्वहि त्यांत स्पष्टत्वाने प्रगटलें असल्यामुळे आटीव दुधांत खडीसाखर पडावी तशागत या काव्यकृतीला एक आगळी आणि अवीट गोडी आलेली आहे.

"व्हराड् मातींत" तीन प्रदिर्घ कवनें समाविष्ट आहेत. त्यांतील एकएक कवन आपल्यापरी सरस आणि नितांतसुंदर आहे. "वऱ्हाड मातीवरील – वऱ्हाडी बोलींतील प्राय: पहिलींच प्रदीर्घ कवनें" हा कवीचा दावा यथार्थ आहे, त्याशी कुणीहि सहमतच होईल. एवढेंच नव्हे तर या कवनांमुळे काव्यक्षेत्रांत एक नवें दालन उघडण्याचें श्रेय देखील 'शरच्चंद्र' यांच्या पदरीं पडलें आहे.

कवीने हीं कवनें बहुजनसमाजाकरिता जरी रचलेलीं असलीं तरी तीं सामान्य वऱ्हाडी वाचकांस आणि महाराष्ट्रीय रसिकांसहि रूचतील असा मला भरवसा आहे. याच भाषेंतील लोकगीतें, कादंबरी आणि लघुकथा इत्यादि विषयावरील पुस्तकें यापूर्वीच महाराष्ट्रांत लोकमान्य आणि राजमान्य झालेलीं आहेत. इतकेंच नव्हे तर त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें यथोचित पारितोषिकें लाभून, विद्वज्जनांकडून त्यांचा योग्य गुणगौरवहि झालेला आहे आणि म्हणूनच या काव्याचेंहि त्या उदार रसिकांकडून कोडकौतुक व गुणगौरव झाल्याखेरीज राहणार नाही याचा मला पूर्ण भरवसा आहे.

कवीने प्रथमतः "मातीच्या बोलींत। मातीचं भजेन। या गा संतजेन। आसीसाले॥" म्हणून आशीर्वादासाठी थोर संतजनांना प्रेमाने पाचारित केलें आहे. मी कांही संत नाही – म्हणून आशीर्वाद देण्याइतका माझा अधिकार मी मानीत नाही, पण मी रसिक मात्र आहे. म्हणून वयाने जरी मी जेष्ठ असलो तरी हे कवि गुणाने माझ्यापेक्षा कितीतरी

मराठी ग्रंथ सं . . . ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक .... नों. दि: ....

श्रेष्ठ आहेत हें नमूद करायला मला यत्किंचितहि संकोच वाटत नाही. शहाणपणाप्रमाणेच मोठेपणाहि वयावर अवलंबून अर्थातच नसतो ! थोडक्यांत सांगायचें म्हणजे " व्हराड् माती " या काव्याच्या अर्थसौंदर्यांतून जसा तत्वबोध आविष्कृत झालेला आहे, तसाच कोमल किन्नर संगीताप्रमाणें त्यांत श्रवणसुभग अशा नाद लालित्याचाहि उद्भव जाणवतो. अतएव, वऱ्हाड मातीवरील आणि वऱ्हाडी बोलींतील हीं भजनें एक वेगळाच आस्वाद व एक वेगळाच आनंद देतात.

सांप्रत शिक्षणाचा प्रसार समाजाच्या सर्व थरांत झपाट्याने होत असल्यामुळें मराठी भाषा अर्थातच एका वळणाची होत चालली आहे, हें चांगलें, पण त्यामुळेंच तिच्या मोलवान अशा पोटभाषा लुप्तप्राय होण्याचा धोका पैदा झाला आहे. पण ही वऱ्हाडी भाषा आपलकीने राखून ठेवण्याची क्षिति बाळगणारे व प्रत्यक्ष कृतीने तिची महति वाढविणारे साहित्यिक तिच्या सुदैवाने आज वऱ्हाडच्या या मातींत निर्माण होत आहेत हीं तिच्या सौभाग्याचींच लक्षणें होत. पण ही प्रगति द्रुतगतीने व्हायची ती होत नसून केवळ मुंगीच्या मंदगतीने होत आहे हें मात्र विसरून चालण्यासारखें नाही.

वऱ्हाडी भाषेचें स्वरूप ग्रंथनिविष्ठ मराठीपेक्षा थोडें अलग पडतें. प्रथमपुरूषीं – एकवचनी – वर्तमानकाळीं क्रियापदाचें रूप तीन्ही लिंगी वऱ्हाडी भाषेंत एकच असतें. पण हा प्रकार संस्कृत आणि इंग्रजी या प्राचीन आणि प्रगत भाषांत जिथें रूढ आहे, तिथें या बिचाऱ्या वऱ्हाडीला 'मूढ' समजून हिणविण्यांत स्वारस्य काय ? तसेच ळ, ण, यांच्या जागीं य, न, येतात. 'माझ्या' ऐवजी 'माह्या' हें आणि असलींच कोमल रूपें येतात पण त्यामुळेंच तिच्यांत एकप्रकारचें गोड मार्दव येते. शिवाय त्यांच्या जोडीला अरबी आणि फारसी शद्बांची भर असल्यामुळेहि ती भरदार भासते. पण बोलताना नाकांतून ओझरते उच्चार काढण्याची सवय असणाऱ्या कांही पंडितांना मात्र ती खटकत असेल तर त्याला इलाज

नाही ! वास्तविक वऱ्हाडी भाषेंत मूळचाच गोडवा आहे. शुद्ध अंतःकरणांतील ओलावा आहे. तिच्यांतील सरस उपमा आणि दृष्टान्त तर खेडोपाडीं स्त्रियाच्या तोंडीं रोजच्या व्यवहारांत हरहमेश दिसून येतात आणि म्हणूनच वऱ्हाडची ही भाषा अंगावर निवडक अलंकार चढवून लाजेने चूर होऊन चाललेली नाजुक नार वाटते. तिच्या त्या हृदयाचा खराखुरा आविष्कार या सहजसुंदर, हृदयंगम आणि मनाला नितांत आनंद देणाऱ्या अशा गोड काव्यांत पदोपदीं झालेला दिसून येईल.

प्रस्तुत भाषेंतील कांही शद्ब कुणाला अपरिचित वाटतील, पण त्यांचे मूळ शोधून काढल्यास ते संस्कृत भाषेंत आढळून येतील. यावरून वऱ्हाडी भाषा ही संस्कृतच्याहि समीप आहे असें विधान अतिशयोक्तीचें ठरणार नाही. कवीच्याच शद्बांत सांगायचें म्हणजे ही वऱ्हाडी भाषा "काट्यानं भारली । भर्दार बाभूय ।" अशी वरवरून जरी ओबडधोबड वाटली तरी "बुंध्याले हरय् । कोम्ब घेत्ये ।।" अशी अंतर्यामी कोवळ्या प्रकृतिची आहे. एवढेंच नव्हे तर "काकड पाहचेटी । शेन–शिपत्रन । रही जात्यांतून । किस्न गात्ये ।।" हें शुचिः अंतःकरण देखील अर्थात तिला आहे. इतके तिच्याविषयीं सांगितलें तरी पुरें असें वाटतें.

"व्हराड् माती" नंतर "पान्याचं अभंग्" आणि "कस्टाचं अभंग्" यांत कवीने "तुक्याची साऊली पिऊन" जरी "जुनीं बिरूदेंच" या अभंगांत गोवलीं आहेत, तरी त्यांत त्यांनी आपलें अंतरंग ओतून त्यांना स्वतःचा असा वेगळाच व नवा रंग चढविलेला आहे. "पान्याच्या अभंगांतील" पाणी तर गंगाजळाप्रमाणें केवळ निर्मळ आहे. कवीच्याच शद्बांत सांगावयाचे म्हणजे तें "झाडांत चंदेन । पुस्तेकांत येद । रसांत शहेद" अशा "गंगाजया ।।" प्रमाणेंच आहे. तसेंच "कस्टाच्या अभंगाचा" गाभा आविष्कृत करण्यास "कस्टासिवा जो जो । करे देव देव । राहे त्याचा पेव । रीकामाच ।।" या मार्मिक काव्यपंक्ति पुरेशा आहेत. कष्टाची महति पटविण्यास "खुंट्यावरचा जोर ढिल्ला झाला म्हणजे भाकरीच्या पीठाचा उंडा नासतो" हीं चरणें सूचक आहेत. त्यांतील इशाराहि

पटण्यासारखा आहे. तथापि उदंड जमीन लाभली, पण ती वाहीत करतांना तिच्यांतील कुंदाकाडी न काढली तर पिकाची नासाडी होते हें कवीचें म्हणणें खरे मानले तरी पिकाला वरून वा खालून पाण्याचा झरा नसला म्हणजे त्याचा वाळून चुरा होतो, हेंहि तितकेंच खरें आहे. दैव आणि प्रयत्न यांचा हा झगडा अनादि कालापासून निसर्गतः संतत चालू आहे. त्यांतूनहि "खोल कस्ट रेषा ज्याच्या हातीं, त्याच्याच पदरीं मोती" हा कवीचा सिद्धान्त देखील अमान्य होण्यासारखा नाही !

कवीस एक प्रेमळ सूचना मात्र करावीशी वाटते वऱ्हाडी भाषेंतील मूळचे सुंदर वाक्प्रचार आणि सूचक म्हणी यांची अवहेलना त्यांनी करू नये. साहित्यांत सहजसुलभ प्रासादिक रचना केल्याने वा वऱ्हाडी शद्बांचा वापर केल्यानेच तिची मानना वाढणार नाही. जिच्या मूळांत "चंदनाचा गाभा" दवंळतो, जिच्या "ठायी ठायीं कोमल अंकुरांची आभा लहरते", त्या वऱ्हाडीची संपन्नता वाढवावयाची झाल्यास प्रस्तुत सूचनेकडे मुळींच दुर्लक्ष करता येणार नाही. वऱ्हाडी भाषेला उपमाच द्यावयाची झाल्यास, मागेपुढे पडदाणी लागलेल्या प्रशस्त दमणींत निवांतपणें बसून चाललेल्या मर्यादशील रमणीचीच द्यावी लागेल. पडदाणी लागलेल्या दमणींत देखील जिच्या माथ्यावरील सेव खांद्यावर ढळत नाही, अशा घरंदाज खानदानी संस्कारांत आणि वऱ्हाडी मर्यादेंत वाढलेली ही तेजस्वी तरूणी आहे. तिचें नाजुक नख कधींच ज्यांच्या दृष्टीला पडलें नाही त्या शालश्लिष्टांनी वाटल्यास तिच्यावर खुशाल अश्लिष्ट म्हणून दावा करवा, पण त्याने का तिला हिणावा येणार आहे !

वास्तविक "महाराष्ट्राच्या पंचप्राणापैकी आपला हा वऱ्हाडहि एक प्राण" आहे. या वऱ्हाडची बोली म्हणजे तिच्या काळ्याशार मातीची मुलायम प्राणबोली !" तंतोतंत दुसरी उपमा द्यावयाची म्हणजे "काळी कस्तुरी !" पण नाभींत कस्तुरी असलेल्या या वऱ्हाडांतील मृगांना देखील दुर्दैवाने तिचा सुगंध आज जाणवत नसल्याचें दिसत आहे. त्या दृष्टीने

तरी कवीने केलेल्या या वऱ्हाडी भाषेंतील भजनाचें "प्रयोजन आणि औचित्य" आज अगत्याचेंच नव्हे तर आवश्यकहि आहे.

या वऱ्हाडी भाषेची, अर्थात ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे कांही लोकांनी आजतागायत यथामति सेवा केलेली आहे. पण आता मात्र त्यांच्या गोवऱ्या हळूहळू स्मशानाची वाट सुधारू लागल्यामुळे भुजैला चवऱ्या बांधून कंबर कसण्याची त्यांची ती हिम्मत दिवसेंदिवस कोसळू लागली आहे, आणि त्यामुळेच तिच्या सौभाग्याचे चुडे उजळण्याकरिता "शरच्चंद्रां"सारखे जे तडफदार वृत्तीचे तरूण कवि पुढे येत आहेत त्यांच्याबद्दल आमच्यासारख्या जुन्या लोकांना निःसंशय अभिमान कां वाटणार नाही ? पण हें काम एकटया-दुकटयाचें मात्र नव्हे. आपली ही भाषा उजळविण्यासाठीं, तिच्या निरनिराळ्या पैलूंना पाणी चढविण्यासाठी, ज्यादिवशीं शरच्चंद्राप्रमाणें तरुण साहित्यिकांची रांग लागेल त्याच दिवशीं तिचे पांग फिटल्याशिवाय राहणार नाही. "याच देहीं याच डोळा - तो भाग्याचा सोहळा पाहावयास मिळावा" हीच त्या जुन्या लोकांची आता मरताना अखेरची इच्छा राहणार !!

REFBK-0011958
REFBK-0011958

यवतमाळ,

दिनांक २५-२-६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
११९५८
अनुक्रम .... वि० ....
क्रमांक .... नों० दि० ....